ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VIII, Issue - XV, Vol.- I | Impact Factor 3.42 (GRIFI) | Jan. 2017 To June 2017

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

Editor In Chief

Dr. Balaji Kamble

Scanned with CamScanner

RNI MAHMUL 02005/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 4.42
ISSN 0976-0377
Issue : XV, Vol. I, Jan. 2017 To June 2017

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author (s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Emerging Challenges of Banking Sector | Dr. Balaji N. Devkate | 1 |
| 2 | Narcissist Dimension of Women Identity in Henry James Novel | Jeetendra N. Deshmukh | 5 |
| 3 | समकालीन हिंदी दलित कहानी में सामाजिक चेतना | डॉ. गौतम भाईदास कुवर | 10 |
| 4 | हिंदी उपन्यास की वर्तमान स्थिति और आदिवासी चिन्तन | डॉ. अर्जुन शंकरराव कसबे | 15 |
| 5 | जवाहर रोजगार योजना प्रशासन : कभी खुशी कभी गम | डॉ. गंगणे जीवन सुदामराव | 20 |
| 6 | व्यवस्थापन शास्त्राचा विकास | एम. बी. राठोड | 26 |
| 7 | ग्रामीण विकासाविषयी महात्मा गांधी यांचे विचार | डॉ. प्रभाकर गु. आठवले | 35 |
| 8 | नगरपालिकेचा इतिहास | आश्विन गुरुनाथराव हावा | 40 |
| 9 | दर्याबाई निंबाळकर | डॉ. आर. एम. साळुंके | 44 |
| 10 | महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य | अनिल विठ्ठल बाविस्कर | 51 |
| 11 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील स्त्रियांचे योगदान | डॉ. सविता गंगाधरराव मुंढे | 64 |
| 12 | सरकारी नोकरी करणाऱ्या स्त्रीयांना येणाऱ्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन - विशेष संदर्भ धुळे जिल्हा | कल्पना उत्तमराव सोनवणे<br>डॉ. सुनिल संभाजी मायी | 69 |
| 13 | मगानरेगाच्या लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन | भुषण इंदर भामटेराजपुत<br>डॉ. उमेश देविदास वाणी | 74 |
| 14 | महिला सबलीकरण : एक अवलोकन | राजरत्न केशवराव एकंबेकर | 79 |


Scanned with CamScanner

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 4.42 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XV, Vol. I, Jan. 2017 To June 2017


# महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य

**अनिल विठ्ठल बाविस्कर**
इतिहास विभाग,
कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
अक्कलकुवा, जि. नंदुरबार (महाराष्ट्र) भारत

10 **Research Paper - History**

१९ व्या शतकातील महाराष्ट्राचा आढावा मागील प्रकरणात आपण घेतला आहे. प्रत्येक विचारवंत हा त्या त्या काळचे अपत्य असतो असे म्हणतात. त्याप्रमाणे महात्मा फुले ज्या काळात जन्मले,या काळात त्यांची ज्या एका विशिष्ट परिस्थितीत जडण घडण झाली. त्यांचा मागोवा आपणाला या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

**महात्मा फुलेंचा जन्म व बालपण :**

महात्मा फुले यांचा जन्म माळी कुटूंबात झाला. हिंदु समाजातील क्षत्रिय माळी जात कनिष्ठ थरातील शेतकरी वर्गापैकी होती. फुले घराण्याची मुळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. फुल्यांचे पणजोबा कटगुणचे चौगुले होते. चौगुला हा बारा बलुतेदारा पैकी एक गावकामगार समजला जात असे. त्याला गावातील पाटील व कुलकर्णी या प्रमुख अधिकाऱ्यांच्या दस्तरांची ने - आण करणे, सारा वसुली करणे, कापणीच्या हंगामात पिकाची पाहणी करण्यास मदत करणे इत्यादी कामे करावी लागत असत. ही कामे करताना या अधिकाऱ्यांशी काही कारणावरून जोतीबांच्या पणजोबांचा खटका उडाला व त्यामुळे ते कटगुण सोडून पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे रहावयास गेले. त्यांना एक मुलगा झाला त्याचे नाव शेटीबा ठेवण्यात आले तो व्यसनी व उधळ्या निघाल्यामुळे त्यांना उदरनिर्वाह चालविणे अशक्य झाले. त्यामुळे त्यांनी पुण्याला स्थलांतर केले त्यांना राणोजी, कृष्णा व

Scanned with CamScanner

गोविंदा असे तीन मुले झाली. प्रारंभी ही मुले शेळ्या राखण्याचे काम करीत असत. या मुलांचा कष्टाळूपणा व प्रामाणिक पाहून त्यांच्या मालकाने त्यांना फुलांचा व्यवसाय शिकविला. या व्यवसायात त्यांनी इतका लौकीक प्राप्त केला की त्यांचे मुळ गोऱ्हे हे आडनाव मागे पडून फुले या नवाने ते ओळखले जाऊ लागले. या कामाची किर्ती पेशव्यांच्या कानावर गेलो व पेशव्यांनी त्यांना फुले घालण्याचे व फुलांच्या वस्तु तयार करून पुरविण्याचे काम दिले.

पेशव्यांसाठी ते उत्कृष्ट फुलांच्या गाद्या, उश्या आणि पोषाखही बनवित असत. या सेवेबद्दल खुष होवून पेशव्यांनी फुल्यांना पस्तीस एकर जमीन ईनाम म्हणून दिली. शेटीबाच्या मृत्युनंतर राणोजीने आपल्या दोन बंधुना बाजुस सारून ईनाम दिलेली जमीन स्वत:च्या नावे करून घेतली. त्यामुळे कृष्णा व गोविंदा यांना वाईट दिवस आले त्यांनी आपला फुलांचा धंदा सचोटिने चालविला, तसेच पुण्याजवळील एका खेड्यातील मळ्यातील गोविंदाने काम सुरु केले. आपल्या मळ्यातील भाजीपाला विकण्यासाठी पुण्यात भाजी पाल्याचे दुकान घातले. त्यावर त्यांची परिस्थिती सुधारली. गोविंदाचा चिमणा नावाच्या मुलीशी विवाह झाला. चिमणा ही पुण्याजवळील धनकवडी गावातील झगडे पाटील यांची मुलगी होती. गोविंदाला राजाराम व जोती असे दोन मुले झाली. जोतीचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. फुले जेमतेम एक वर्षाचे झाले असतीलतोच त्यांची आई चिमणाबाई मरण पावली. त्यामुळे त्यांच्या वडीलावर दोन्ही मुलांच्या संगोपनाची जबाबदारी पडली. परंतु त्यांच्याच नात्यातील सगुणाबाईनी ही जबाबदारी आईच्याच मायेने पार पाडली व त्यांच्या बालमनावर मानवता धर्माचे सुस्कार केले. आपल्या जोतीबाने ख्रिस्ती फादर सारखे व्हावे आणि त्याच्या हातून गोरगरीब व महार-मांग समाजाची सेवा व्हावी अशी सगुणाबाईची ईच्छा होती. जोतीरावांच्या घडणीत सगुणाबाईचा कार्यभाग नि:संशय गौरवास्पद आहे.

फुले पुण्याच्या ज्या मीठगंज पेठेत रहात होते तो भाग जानाईचा मळा म्हणून ओळखला जात असे. काबाडकष्ट करून हातावर पोट भरणारी अठरा पगड जातीची ही वस्ती होती. कष्ट, दारिद्रय दैन्य ही त्यांच्या पाचविलाच पुजलेली असायची. पुण्याच्या सुधारणेचा वारा खऱ्या अर्थाने त्यांना लागलेलाच नव्हता. अशा या मागास भगात जोतीराव जन्मले वाढले व पुढील कार्यासाठी प्रेरित झाले.

फुल्यांचे शिक्षण -

आधुनिक दृष्टिने ज्याला आपण शिक्षण म्हणतो तसे शिक्षण त्या काळात अस्तित्वात नव्हत. कांही उच्च वर्णियांचीशिक्षणाची सोय गुरुकुल,पाठशाला, व धार्मिक तिर्थांच्या ठिकाणी

Scanned with CamScanner

पंतोजीच्या माध्यमातून केलेली असे. या शाळातून धर्मशास्त्र, वैदकशास्त्र, जोतीषशास्त्र, यज्ञशास्त्र, वेद वेदांत व संस्कृत इ. चे शिक्षण दिले जात असे.

समाजातील कनिष्ठ वर्गातील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाही अशीच ठाम समजुत त्या काळामध्ये रूढ होती. त्या काळातील एकुण शिक्षणाचे विदारक चित्रण तत्कालीन गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने आपल्या अहवालात नमुद करून ठेवले आहे.

त्या काळातीलशिक्षणा संबंधीची अशी प्रतिकूल परिस्थिती कनिष्ठ वर्गीयांच्या बाबतीत असली व गोविंदराव फुले यांच्या ज्ञातीत कोणी शिक्षणही घेतलेले नसले तरी गोविंदराव फुल्यांनी जोतीरावांना वयाच्या ७ व्या वर्षी शाळेत घातले ही गोष्ट निश्चितच प्रशंसनीय होती. जोतीरावांनी तीन - चार इयत्ताचाअभ्यास पूर्ण केला असेल नसेल तोच उच्चवर्ण्यि पुराणमतवादी सनातनी मंडळीनी कनिष्ठ जातीतील मुलांना शिक्षण दिल जाऊ नये या हेतुने 'सरकारी शाळांमधुन जी मुले शिक्षण घेतील त्यांना इंग्रज सरकार बाटवून खिस्ती बनवणार आहे'. अशी ओरड सुरू केली. या सर्व गोष्टींचा परिणाम अज्ञानी धर्मभोळ्या लोकांवर झाला व त्यांनी आपापल्या मुलांना शाळेतून काढून घरी बसविले. गोविंदराव फुल्यांनाही उच्चवर्णीच ब्राह्मणांनी जोतीरावांचे शिक्षण बंद करण्यासाठी अनेक युक्त्या लढविल्या. परिणामी गोविंदरावांनी जोतीरावांना शाळेतून काढले. प्रचलित रितीरिवाजाप्रमाणे जोतिरावांचे १३ व्या वर्षी लग्न झाले त्यावेळी सावित्रीबाई ८ वर्षाच्या होत्या. शिक्षण बंद झाल्यामुळे ते दिवसभर शेतातील काम करून वडीलांच्या कामाचा भार हलका करू लागले. जेमतेम शिक्षणातून वाचनाची निर्माण झालेली आवड जोतीरावांना स्वस्थ बसू देत नव्हती. ते दिवसभराच्या श्रमाने थकून गेल्यानंतरही रात्री उशीरापर्यंत दिव्याच्या मिणमिणत्या प्रकाशत वाचन करीत असत. शिक्षणासंबंधीची त्यांची ही तळमळ त्यांच्या शेजारी राहणारे गफार बेग मुन्शी आणि लिजीट साहेब यांच्या लक्षात आली व त्यांनी गोविंदरावांना शिक्षण घेणे कसे आवशयक आहे हे समजावून सांगितले. परिणामी सुमारे तीन वर्षाच्या खंडानंतर जोतीरावांचे शिक्षण पुन्हा सुरू झाले.

**महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक कार्य :**

प्राचीन काळी भारतात एक अत्यंत परिपक्व संस्कृती आकारास येत होती. विश्वमानवतेचा उद्घोष याच संस्कृतीने आपल्याच काळात केला होता. गुरुशिष्य परंपरा होती. पुरुष आणि स्त्रिया दोघेही गुरुगृही जाऊन शिक्षण घेत असत. वेद व उपनिषदामधील असलेल्या अनेक सुक्ते, कथा आणि उदा. वरुन संस्कृती प्रचिती येते. परंतु गेल्या हजार दीडहजार वर्षाच्या ज्ञात इतिहासात एकूणच सामाजिक अवनती सातत्याने झाल्याचे दिसून येते. यामधल्या हजार दीडहजार वर्षाच्या

Scanned with CamScanner

इतिहासात पुरुषाबरोबर स्त्रियांनी मान मिळविलेला दिसून येतो. अनेकांना कर्तृत्व गाजविण्याची संधी थोड्या प्रमाणात मिळालेली दिसते, त्यातूनच त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा आजतागायत दिसतो. महाराष्ट्राच्या इतिहासात एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभात ईस्ट इंडिया कंपनीचे वर्चस्व वाढू लागल्यानंतर भारतीयांना इंग्रजी शिक्षण दिले पाहिजे असा विचार निर्माण होऊ लागला. यातूनच सर्वसामान्य समाजामध्ये शिक्षणाचे महत्व वाढीस लागले.

"शिक्षण ही एक शक्ती आहे. मानव इतर सजीवांपेक्षा वेगळा व वैशिष्ट्यपुर्ण ठरला तो त्याच्या ज्ञानसाधनेमुळेच. शिक्षण हे समाज बदलण्याचे प्रभावी साधन आहे. बदलत्या समाजाबरोबर मानवी इतिहासात शिक्षणाचा मूळ झरा अधिक व्यापक बनला. त्याने अनेक देशांत नवजीवनाची उभारणी केली.

"कर्मकांडाच्या सोवळ्या-ओवळ्याच्या, तथाकथित धर्ममार्तडांच्या स्वार्थाचे साधन बनुन वैदिक धर्माने जेव्हा सामान्यांच्या जीवनाची कोंडी केली तेव्हा गौतमबुध्दांनी 'अत्त दीपो भव' हा दिलेला मंत्र शिक्षणाचे सामर्थ्य प्रकट करणारा होता. बदलत्या समाजाबरोबर शिक्षपध्दतीत बदल होत असले तरी हे बदल सुखासुखी झाले नाहीत. धर्ममार्तडांच्या, पुराणमतवाद्यांच्या पुरोहिताशाहीच्या हिताचे रक्षण करणारी समाजव्यवस्था व त्यारितीने बदलणारी शिक्षणव्यवस्था या प्रस्थापित वर्गाने त्याला कडवा विरोध केला. 'या संघर्षातून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत एका क्रांतिकारी पर्वाला सुरुवात झाली. त्यातुनच अनेक क्रांत्यांनी व क्रांतिकारकांनी जन्म घेतला. या क्रांतिकारकांमध्ये महात्मा फुले यांचे नाव अग्रभागी होते कारण त्यांनी शैक्षणिक क्रांतीची मशाल आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात पेटवली होती.'" महात्मा फुले या क्रांतीकारक पुरुषाच्या समाजपरिवर्तनाच्या कार्यामुळेच आज सर्व जगभर त्यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या कार्याच्या सीमा राज्यापुरत्या मर्यादित नव्हत्या. जोतीबांच्या पुर्वकाळात समाजातील कनिष्ठ वर्गातील लोकांना शिक्षणाचा मूळीच अधिकार नव्हता. खाजगी शास्त्री पाठशाला चालविणाऱ्यांनी कनिष्ठ जातींना शिक्षण द्यावे असा विचार कधीच केला नाही. मात्र तत्कालीन पंतोजीकडून व्यापाऱ्यांच्या आणि श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देण्यात येई. जेणेकरुन कारकूनी वा सावकरी व्यवसाय चालविता यावा. हाच मूळ उद्देश होता.

एकोणिसाव्या शतकातील समाज जीवन धर्मसत्ता व राजसत्ता या यंत्रणावर अवलंबून होते. धर्माचे वर्चस्व बळकट केले जात होते. शुद्रातिशुद्रांना लिहिता वाचता येत नसल्याने, याचा गैरफायदा घेतला जात होता. ब्रिटिशांना येथील सर्वच बाबतीत माहिती कमी असल्याने, उच्च वर्णीयांकडून फायदा उठविला जात होता. शिक्षणाशिवाय माणूस अपूर्ण असतो. शिक्षणामुळे मानवी जीवन प्रगल्भ होते, डोळसपणा येतो. परंतु हा डोळसपणा शुद्रातिशुद्रांच्या नशीबात नव्हता. सांगितलेले काम ऐकायचे, मन मारुन जगायचे, अर्धनग्न राहून उपाशीपोटी उर फुटेपर्यंत राबायचे शिक्षण वेगवेगळ्या भयानक अत्याचारांना त्यांना सामोरे जावे लागे. ही समाजातील सारी विषमता मन सुन्न

करणारी होती म्हणून जोतीरावांनी ती दूर करण्यासाठी अहोरात्र कष्ट केले.

**शिक्षणाचे महत्व :**

"शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. हा अतिशय महत्वाचा संदेश महात्मा फुले यांनी 'तृतीय रत्न' या नाटकातून दिला. महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षणास विशेष महत्व दिले. स्त्रिया, शुद्र आणि अतिशुद्रांमध्ये शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे हेच त्यांनी आपले जीवनमध्ये मानले होते. शिक्षणाशिवाय भारतीय समाजाचा विकास होऊ शकत नाही हे महत्वांचे सूत्र त्यांनी मांडले. आज शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रियांमध्ये शिक्षणाची जी जाणीव निर्माण झाली. त्यांचे श्रेय महात्मा फुले यांना आहे. आधुनिक काळात शिक्षणासंबंधीचा अतिशय क्रांतिकारी विचार त्यांनी मांडला आणि तो प्रत्यक्ष भारतीय समाजात रुजविण्याचे ऐतिहासिक कार्यदेखील त्यांनी केले."

महात्मा फुले यांना शिक्षणाचे महत्व कळले होते. केवळ अविद्येमुळे शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रिया गुलामीचे जीवन जगत आहेत असे त्यांचे स्पष्ट मत होते म्हणून महात्मा फुले विद्येचे महत्व स्पष्ट करताना म्हणतात की,

"विद्येविना मती गेली
मतीविना गती गेली
गतीविना नीती गेली·
नीतीविना वित्त गेले
वित्तविना शुद्र खचले
एवढे अनर्थ एका अविद्येने केले."

विद्या नसल्यामुळे बुध्दी नष्ट झाली. बुध्दी नाही म्हणून प्रगती नाही. प्रगती नाही म्हणून नीती नाही, नीती नाही म्हणून पैसा नाही आणि पैशांअभावी शुद्र खचले. इतके सर्व अनर्थ हे केवळ एका अविद्येने केले म्हणून महात्मा फुले लोकांना उपदेश करतात की, आता तरी तुम्ही मागे जाऊ नका. ज्या मनुस्मृतीमुळे तुमचे अहित झाले त्या मनुस्मृतीचा तुम्ही निषेध करा कारण मनुस्मृतीने तुम्हाला शिक्षणाचा अधिकार नाकारला आहे. जर तुम्ही शिक्षण घेतले तर तुम्हाला सुख मिळेल.

"आता तरी मागे घेऊ नका ।
धिक्कारुनी टाका । मनुमता ॥
विद्या शिकताच ते सुख ।
घ्यावा माझा लेख । ज्योती म्हणे ॥"

विद्येचे महत्व स्पष्ट करताना महात्मा फुले यांनी समाजाच्या विकासाचे मूळ कारण विद्या हेच आहे, म्हणून समाजातील सर्व घटकांनी धर्मशास्त्राची बंधने झुगारुन शिक्षणाची दारे ठोठावली पाहिजे, शिक्षणाची कास धरली पाहिजे असे त्यांनी आग्रहाने मांडले. व त्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न

Scanned with CamScanner

केले. हे त्यांनी आग्रहाने मांडले व त्यासाठी प्रयत्न केले.

शिक्षण नसल्यामुळे शुद्र आणि अतिशुद्र यांना ब्राम्हण कसे फसवित याचे सविस्तर विवेचन महात्मा फुले यांनी "ब्राम्हणांचे कसब" या पुस्तकात केले आहे.

"सुड घेतला । नीच मानिला ॥
शिवता जाती आंघोळीस ॥
शिकवितों कोण लिहिण्यास ॥

यावरुन हे स्पष्ट होते की, शिक्षणाचे महत्व फुले यांनी ओळखले होते म्हणून कोणत्याही परिस्थितीत शुद्र, अतिशुद्र आणि स्त्रिया यांना शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांचे कल्याण होणार नाही. त्यासाठी आपल्या मुलामुलींना दररोज शाळेत पाठवा असा उपदेश ते करतात. "महात्मा फुले यांनी आपल्या संपूर्ण जीवनात शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असा विचार सतत केला. अज्ञानामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून शिक्षण घेणे आवश्यक आहे."

**भारतातील शैक्षणिक परिस्थिती :**

महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांचे अध्ययन करण्यापुर्वी भारतातील शैक्षणिक परिस्थितीची माहिती घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार किती मुलगामी होते हे लक्षात येईल. भारतात जोतिष व्यवस्थेवर आधारीत समाजव्यवस्था असल्यामुळे शिक्षणाचा प्रसार वरच्या थराकडून खालच्या थराकडे जाऊ शकला नाही. भारतात तत्कालीन राज्यकर्त्यांना प्रजेला शिक्षण देणे हे आपले कर्तव्य वाटलेच नाही. कनिष्ठ वर्गातून शिक्षण घेण्याचा ज्यांनी प्रयत्न केला. त्यांना जबरदस्त शिक्षा झाल्या. भारतीय समाजावर वर्ण व जातीव्यवस्थेचा प्रभाव होता.

**शैक्षणिक समताविषयक विचार :**

"महात्मा फुले हे मानवतावादी होते ते दु:खी, कष्टकऱ्यांच्या बाजूने होते. शुद्रातिशुद्र आणि स्त्रियांचे कैवारी होते. भट-ब्राम्हणांच्या विचारांवर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता. श्रेष्ठ - कनिष्ठ, उच्च - नीच यासारख्या भेदाच्या ते विरुध्द होते ते समतेच्या विचारांचे पाईक होते. एकोणिसावे शतक हे वैचारीक आंदोलनाचे शतक समजले जाते. या काळात जगभरचे विचारंवत समतेचा विचार प्रभावीपणे मांडत होते. या विचारांचा महात्मा फुले यांच्यावरही प्रभाव पडला होता. ते समतेच्या तत्वाने प्रेरित झाले होते."

एकोणिसाव्या शतकात सुशिक्षितांचा वर्ग उदयास आला त्यामुळे अनेक विचारवंत समतेचा पुरस्कार करु लागले. "शिक्षण ही कोणा एका समाजाची मक्तेदारी नाही. ते सर्वांनाच मिळाले पाहिजे यावर त्यांचा जोर होता. स्त्रियांना गुलामगिरीत जखडून भारतीय समाजाची फार मोठी पीछेहाट झाली आहे. ती जर भरुन काढायची असेत तर स्त्रियांना सर्व बंधातून मुक्त करायला

पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. पारंपरिक विषमता नष्ट करुन नवा समताधिष्ठित समाज निर्माण करता येईल याचा त्यांनी विचार केला होता. समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी शिक्षण, प्रबोधन, कायदे, व्यवसाय स्वातंत्र्य इ. मार्गाचा अवलंब केला जाऊ शकतो असा त्यांचा विचार होता."

"स्त्री-पुरुष समानता आणि स्वतंत्र आहेत असा केवळ विचार मांडून महात्मा फुले थांबत नाहीत, तर मानवाचा परिपूर्ण विकास होण्याकरिता ज्या गोष्टीची आवश्यकता असते त्या सर्व गोष्टी स्त्रियांना मिळाल्या पाहिजे. 'पुरुषाप्रमाणे स्त्रीलादेखील मानवी अधिकार आहेत म्हणून कुणी कुणावर जबरदस्ती करु शकत नाही. त्याबाबत महात्मा फुले यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, आपल्या सर्वांच्या निर्मिकाने सर्व स्त्री-पुरुषास एकंदर सर्व मानवी अधिकाराचे मुख्य धनी केले आहे.'" पुरुषाप्रमाणे स्त्रीलासुध्दा मानवी अधिकार आहेत तिच्यावर कुणी जबरदस्ती करु शकत नाही. निर्मिकाने सर्व स्त्री-पुरुषांस समान मानवी अधिकार दिलेले आहेत. पर्यायाने पुरुषाप्रमाणे स्त्री ही मानवी अधिकाराचे मुख्य धनी आहेत.

**महात्मा फुले यांचे स्त्रीशिक्षण विषयक विचार :**

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवले होते. शिक्षणामुळे माणूस जागृत होतो, स्वाभिमानी होतो. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. समाजसुधारणेसाठी स्त्रीशिक्षण हे अत्यंत मोलाचे आहे असे महात्मा फुले यांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याचा प्रारंभ स्त्रीशिक्षणापासून केला. गृहिणीला पाठ प्रथम दिले म्हणजे कुटुंबात आपोआपच शिक्षणाचा प्रसार होईल. सारे कुटूंब शहाणे होईल असे महात्मा फुले यांना वाटत होते ते म्हणतात, "स्त्रियांच्या शाळेने प्रथम माझे लक्ष वेधले, पूर्ण विचारांती माझे असे मत झाले की, पुरुषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक आवश्यकता आहे. स्त्रिया आपल्या मुलांना त्यांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी जे वळण लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे असतात."

"एकोणिसाव्या शतकातील हिंदू मुलींकरिता पहिली शाळा कोलकत्यात १८१९ मध्ये तेथील अमेरिकन मिशनने सुरु केली. त्याकाळी मुली शाळेत आणण्याकरीता शिक्षकाला प्रत्येक दिवशी घरोघर जावे लागे. शिक्षक शाळेत ज्या प्रमाणात मुली आणीत त्या प्रमाणात त्याला वेतन मिळत असे. अमेरिकन मिशनने १८४० ला पुण्याच्या आसमंतात मुलींच्या शाळा उघडल्या होत्या. स्कॉटिश ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी चालविलेली एक मुलींची शाळा पुण्यात होती. सुमारे दहा मुली तिथे शिकत होत्या. ती ख्रिश्चनांची शाळा असल्यामुळे चालू शकली नाही. स्वतंत्रपणे मुलींची शाळा काढणारे महात्मा फुले हेच भारतीय होते."

॥ जिच्या हाती पाळण्याची दोरी ॥

॥ तिच जगाते उध्दारी ॥

Scanned with CamScanner

**मुलींची पहिली शाळा :**

महात्मा फुले यांनी शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे असा आपल्या 'तृतीय रत्न' या नाटकात संदेश देवून शिक्षणाचे महत्व सांगितले. शिक्षणामुळेच समाजाचे सामाजिक राजकिय विचाराबाबतची दिशा बदलते. शिक्षणामुळे समाजात परिवर्तन घडून येते. समाजामध्ये सुधारणांचे अभिसरण होते.

शिक्षण हे जगण्याचे प्रमुख साधन आहे. मानवी समूहाच्या विकासासाठी शिक्षण ही प्रक्रिया अत्यंत महत्वाची आहे. म्हणून "महात्मा फुले यांनी इ.स. १८४८ मध्ये पुणे शहरातील बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली शाळा स्थापन केली. त्यावेळी त्या कमी त्यांना रा.ब. सदाशिवराव बल्लाळ, गोंवडे या सद्‌गृहस्थाने बरीच मदत केली." स्त्रीयांना शिक्षण दिलेच पाहिजे हा निश्चय पक्का करुन त्याप्रमाणे कृती केली. त्यामुळेच पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा सुरु झाली.

"१८४८ रोजी सुरु केलेल्या मुलींच्या पहिल्या शाळेच्या पटावरील नावे अशी होती.

१. अन्नपुर्णा जोशी वय ५ वर्षे
२. सुमती मोकाशी वय ४ वर्षे
३. दुर्गा देशमूळ वय ६ वर्षे
४. माधवी थत्ते वय ६ वर्षे
५. सोनू पवार वय ४ वर्षे
६. ज्योती कर्डीले वय ५ वर्षे

या मुलींपैकी ४ ब्राम्हण १ मराठा, १ धनगर अशा मुली होत्या. शाळेला मुली पाठविणेकरीता हे पालकांच्या भेटी घेऊन त्यांच्या मनाची तयारी करीत."

सावित्रीबाई फुले शाळेत मुलींना शिकवितात ही गोष्ट सनातन्यांना रुचणारी नव्हती. त्यांनी त्यांचा छळ करण्यास सुरुवात केली. "त्या शाळेत जाऊ लागल्या म्हणजे लोक त्यांच्या वाटेवर उभे राहत, त्यांची टिंगल करीत व घालून पाडून बोलत. त्याचबरोबर त्यांच्या अंगावर दगड, धोंडे मारु लागले. शेण, चिखल फेकू लागले. त्यांनी याही प्रसंगाला तोंड दिले. त्यांनी नेसण्यासाठी तीन लुगड्यांची सोय केली. शाळेत जाताना चिखलफेकीमुळे मलिन झालेले लुगडे ते शाळेत गेल्यावर बदलून त्या दुसरे नेसीत व घरी गेल्यावर परत तसाच प्रकार घडला तर अंगावरचे वस्त्र बदलून तिसरे करीत.

**फुले दांपत्याच्या शाळांचा विस्तार:**

१८४८ ते १८५२ या चार वर्षांच्या कालावधीत पुणे आणि पुण्याच्या ग्रामीण परिसरात त्यांनी एकूण १८ शाळा काढल्या. एवढ्या कमी कालावधीत अशा प्रकारच्या शाळा स्थापन करुन त्या

Scanned with CamScanner

चालवणे हे अखंड भारतातील एकमेव उदाहरण दिसून येते. शाळा चालविण्यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम केले. त्यासाठी त्यांनी दिवस पाहिला नाही की रात्र पाहिली नाही, एवढेच नाहीतर "तहानभूक विसरुन या दांपत्याने ह्या परोपकारी कृत्याच्या पिच्छा न सोडता हा ज्ञानदानाचा यज्ञ अहोरात्र प्रज्वलित ठेवला. फुले दांपत्याचे हे कार्य म्हणजे या दांपत्याने घडवून आणलेला एक चमत्कार होता कारण त्या काळात अशा शाळा चालविणे कोटीची गोष्ट होती." महात्मा फुले यांनी ग्रामीण भांगातील स्त्री-पुरुषांसाठी ज्या शाळांची उभारणी केली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे दिसून येतो.

१. भिडेवाडा, पुणे दि. ०१/०१/१८४८
२. महारवाडा, पुणे दि. १५/०५/१८४८
३. हडपसर, जि. पुणे दि. ०१/०९/१८४८
४. ओतुर, जि. पुणे दि. ०५/१२/१८४८
५. सासवड, जि. पुणे दि. २०/१२/१८४८
६. अल्हाटाचे घर, कसबा, पुणे दि. ०१/०७/१८४९
७. नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा दि. १५/०७/१८४९
८. शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा दि. १८/०७/१८४९
९. तळेगाव ढमढेरे, जि. पुणे, दि. ०१/०९/१८४९
१०. शिरुर, जि. पुणे, दि. ०८/०९/१८४९
११. अंजीरवाडी, माजगाव दि. ०३/०३/१८५०
१२. करंजे, जि. सातारा दि. ०६/०३/१८५०
१३. भिंगार दि. १९/०९/१८५०
१४. मुंढवे, जि. पुणे, दि. ०१/१२/१८५०
१५. आण्णासाहेब चिपळूणकर वाडा, पुणे दि. ०३/०७/१८५१
१६. रास्ता पेठ, पुणे दि. १७/०९/१८५१
१७. नाना पेठ, पुणे, दि. ०१/१२/१८५१
१८. वेताळ पेठ, पुणे, दि. १५/०३/१८५२

मिशनऱ्यांनी पुण्यामध्ये मुलींच्या शाळा सुरु केल्या होत्या. चिकाटीने, जिद्दीने व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करण्याची मिशनऱ्यांची पध्दती असुनही पुण्यामध्ये त्यांना यश आले नाही त्यांच्या शाळा पुढे बंद पडल्या परंतु महात्मा फुले यांनी चालिवलेल्या शाळा अत्यंत चांगल्यारितीने सुरु होत्या. म्हणून शिक्षणाबाबतचे केलेले हे कार्य अलौकिक आहे असे म्हणावे लागेल.

Scanned with CamScanner

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 4 No. : 3 Issue -12 Sept.-Dec.2017 ISSN No. :2347-9639

34 Years

UGC Approved Journal No.64299

# VICHAR MANTHAN

IIJIF Impact Factor 2.283

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

## Human Rights and Challenges



महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

## मानव अधिकार आणि आव्हाने

मुख्य संपादक – प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
संपादक – डॉ. प्रमोद पवार | डॉ. मनोहर पाटील

अथर्व पब्लिकेशन्स

Scanned with CamScanner

# ✲ अनुक्रमणिका ✲


- बीजभाषण : मानव अधिकार – समस्या आणि आव्हाने ........ १
  - प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे
- Human Rights and Child Labour in Indian Perspective ........ 14
  - Dr. Prof. Prafulla A. Raut
- Human Rights - Romanticism and Wordsworth's poetry : A Review ........ 17
  - Dr. Vijay Bhaidas Bachchhao
- Human Rights in Perspective of Gender Injustice with Special Reference to LGBT Community in India ........ 19
  - Ashish Ramchandra Gangurde
- A Short History of Human Rights and Its implication in our daily ........ 22
  - Prof. Anil Vitthal Bavaskar
- Human Rights, Human Rights Education and Indian Constitution in India with Special Reference to Rural and Remote Areas ........ 24
  - Atish S. Meshram
- Education in Human Values ........ 27
  - B. M. Shaikh
- Depiction of Gender Justice in George Eliot's 'Silas Marner' ........ 29
  - Mr. Bhausaheb S. Desale
- Human Right and Environment ........ 31
  - Prof. Bhawana D. Valvi
- Social Exploitation Reflected in Alice Walker's 'The Colour Purple' ........ 33
  - Prof. Deepak Shantaram Chaudhari
- Environmental Protection and Human Rights: from National and International Perspective ........ 35
  - Dr. Asha R. Tiwari
- Human Rights and Value Education ........ 40
  - Prof. Asif B. Khatik
  - Prof. Archana T. Suryawanshi
- Human Rights and Child Education ........ 42
  - Dr. Nitesh D. Chaudhari
- Women Empowerment and their Human Right ........ 44
  - Prof. Dr. Ranjeet M. Athawale
- Terrorism : A Massive Human Rights Violations ........ 46
  - Dr. Rohit Arun Pardeshi
- Human Rights and Child Education ........ 49
  - Dr. Surekha B. Jaiswal
- Human Rights and Child Education in India ........ 51
  - Dr. Bahiram Vijay Yuvaraj
- Human Rights and Youth ........ 53
  - Kaushal Rajendra Dhighavkar
- Human Rights and Tribals ........ 55
  - Prof. Kiran S. Marathe
- Human Rights and Pranayama ........ 58
  - Nandre Y. M.
  - More B. C.
  - Pawar L. B.
- Health and Human Rights : Present Status in Indian Scenario ........ 61
  - Ram K. Petare
  - Sanjay P. Khodake
- Review Article on Human Rights, Health and Environmental Protection ........ 64
  - S. J. Nandre
  - R. R. Ahire
- Human Rights Role of Media ........ 66
  - Sachin Uday Wagh
- Human Rights in View of Biodiversity ........ 68
  - V. S. Patil
- Human Right and Women Empowerment ........ 70
  - Prof. Vedu M. Patil
- The Evaluation of Right of Education for Children As A Basic Human Right: The Global Perspective ........ 72
  - Vidya Vijayrao Patil
- Human Values Reflected in R. K. Narayan's 'The Guide' ........ 74
  - Mr. Vijay K. Shinde
- Right to Play in School ........ 76
  - Vinay Pawar
- Human Rights : Issues and Challenges in The Context of Healthy and Safe Environment ........ 79
  - Dr. Vidya Raut
- Human Rights and Child Labour in India - Causes and Remedies ........ 81
  - W. B. Shirsath
  - N. B. Sonwane




Scanned with CamScanner

# A Short History of Human Rights and its Implication in Our Daily Life

**Prof. Anil Vitthal Baviskar**
Dept. of History, Arts and Commerce College
Akkalkuwa, Dist. Nandurbar (MS)

**Introduction**

The word right as "a privilege," when used in the context of "human rights," we are talking about something more basic. Every person is entitled to certain fundamental rights, simply by the fact of being human. These are called "human rights," rather than a privilege, which can be taken away at someone's whim. Every person is entitled to certain rights-simply by the fact that they are a human being. The belief that everyone, by virtue of her or his humanity, is entitled to certain human rights is fairly new. Its roots, however, lie in earlier tradition and documents of many cultures; it took the catalyst of World War II to propel human rights onto the global stage and into the global conscience.

**Precursors of 20th Century Human Rights Documents**

Documents asserting individual rights, such the Magna Carta (1215), the English Bill of Rights (1689), the French Declaration on the Rights of Man and Citizen (1789), and the US Constitution and Bill of Rights (1791) are the written precursors to many of today's human rights documents. Yet many of these documents, when originally translated into policy, excluded women, people of color, and members of certain social, religious, economic, and political groups. Nevertheless, oppressed people throughout the world have drawn on the principles these documents express to support revolutions that assert the right to self-determination.

**The Birth of the United Nations**

The idea of human rights emerged stronger after World War II. The extermination by Nazi Germany of over six million Jews, Sinti and Romani (gypsies), homosexuals, and persons with disabilities horrified the world. Trials were held in Nuremberg and Tokyo after World War II, and officials from the defeated countries were punished for committing war crimes, "crimes against peace," and "crimes against humanity."

Governments then committed themselves to establishing the United Nations, with the primary goal of bolstering international peace and preventing conflict. People wanted to ensure that never again would anyone be unjustly denied life, freedom, food, shelter, and nationality. The essence of these emerging human rights principles was captured in President Franklin Delano Roosevelt's 1941 State of the Union Address when he spoke of a world founded on four essential freedoms: freedom of speech and religion and freedom from want and fear (See Using Human Rights Here & Now). The calls came from across the globe for human rights standards to protect citizens from abuses by their governments, standards against which nations could be held accountable for the treatment of those living within their borders. These voices played a critical role in the San Francisco meeting that drafted the United Nations Charter in 1945.

**The Universal Declaration of Human Rights**

Member states of the United Nations pledged to promote respect for the human rights of all. To advance this goal, the UN established a Commission on Human Rights and charged it with the task of drafting a document spelling out the meaning of the fundamental rights and freedoms proclaimed in the Charter. The Commission, guided by Eleanor Roosevelt's forceful leadership, captured the world's attention.

On December 10, 1948, the Universal Declaration of Human Rights (UDHR)was adopted by the 56 members of the United Nations. The vote was unanimous, although eight nations chose to abstain.

**The Human Rights Covenants**

With the goal of establishing mechanisms for enforcing the UDHR, the UN Commission on Human Rights proceeded to draft two treaties: the International Covenant on Civil and Political Rights (ICCPR) and its optional Protocol and the International Covenant on Economic, Social and Cultural Rights (ICESCR). Together with the Universal Declaration, they are commonly referred to as the International Bill of Human Rights. The ICCPR focuses on such issues as the right to life, freedom of speech, religion, and voting. The ICESCR focuses on such issues as food, education, health, and shelter. Both covenants trumpet the extension of rights to all persons and prohibit discrimination.

**Subsequent Human Rights Documents**

In addition to the covenants in the International Bill of Human Rights, the United Nations has adopted more than 20 principal treaties further elaborating human rights. These include conventions to prevent and prohibit specific



Scanned with CamScanner

abuses like torture and genocide and to protect especially vulnerable populations, such as refugees (Convention Relating to the Status of Refugees, 1951), women (Convention on the Elimination of All Forms of Discrimination against Women, 1979), and children (Convention on the Rights of the Child, 1989). As of 1997 the United States has ratified only these conventions:

The Convention on the Elimination of All Forms of Racial Discrimination

The Convention on the Prevention and Punishment of the Crime of Genocide

The Convention on the Political Rights of Women

The Slavery Convention of 1926

The Convention against Torture and Other Cruel, Inhuman or Degrading Treatment or Punishment

**The Role of Nongovernmental Organizations**

Globally the champions of human rights have most often been citizens, not government officials. In particular, nongovernmental organizations (NGOs) have played a cardinal role in focusing the international community on human rights issues. For example, NGO activities surrounding the 1995 United Nations Fourth World Conference on Women in Beijing, China, drew unprecedented attention to serious violations of the human rights of women. NGOs such as Amnesty International, the Antislavery Society, the International Commission of Jurists, the International Working Group on Indigenous Affairs, Human Rights Watch, Minnesota Advocates for Human Rights, and Survivors International monitor the actions of governments and pressure them to act according to human rights principles.

The concept of Human rights in India too has been modelled upon the definition given in the Universal Declaration of Human Rights, 1948. Section 2 (d) of the Protection of Human Rights Act, 1993 lays down definition of Human Rights: 240 "Human rights mean the rights relating to life, liberty, equality and dignity of the individual guaranteed by the Constitution or embodied in the International Covenants and enforceable by courts in India." The U.N. Declaration on Human Rights as well as other Human Rights Covenants have influenced very much on the Constitution of India and various Indian Statutes which cannot be overlooked.

The Commission also encourages and utilizes the NGOs for organizing Seminars, training programmes and in spreading human rights awareness. To coordinate and canalize the efforts of NGOs working in the field of human rights and to make known their contribution to outside world, NHRC has compiled a National Register of NGOs working in Human Rights area. Human rights violations by the State and its organs have been articulated by a specialist group of NGOs known as "Civil Liberties and Democratic Rights Group?s.? 6.3 NGOs Role as Saviour of Human Rights of an Accused

**References**


1. Laurie S. Wiseberg, "The Role of NGOs in the Protec tion and Enforcement of Human Rights", in Janusz Symonides (ed), Human Rights: International Protection, Monitoring, Enforcement 349 (2003).
2. Kaushlendra Mishra, NGOs in the Human Rights Movement, 20 (2008).
3. Gurjeet Singh, "Role of National Institutions and NGOs in Promotion and the Protection of Human Rights: A Case Study of India", B.P. Singh Sehgal (ed.),
4. Human right act 2005.
5. Times of India
6. India Todays


Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 Special Issue - 76 Dec. 2018 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

# HISTORY OF KHANDESH

## खानदेशचा इतिहास



■ GUEST EDITOR ■

Dr. Vijay Y. Jadhav

■ EXECUTIVE EDITOR ■

Prof. Satish M. Borse

■ CHIEF EDITOR ■

Mr. Dhanraj T. Dhangar

RESEARCH JOURNEY

MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# INDEX


| No. | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| १ | खानदेश के आर्थिक एवं सांस्कृतिक विकास में फारुकी सुल्तानों का योगदान<br>प्रो. जे.सी. उपाध्याय | ११ |
| २ | साने गुरुजींच्या सामाजिक सुधारणा विषयी असलेल्या दृष्टीकोनाचा चिकित्सक अभ्यास<br>प्रा. अवित रघुनाथ पाटील, डॉ. डी.एन. वाघ | १५ |
| ३ | शाहूराजांची सुटका व त्यांना खानदेशमधून मदत<br>प्रा. अनिल विठ्ठल बाविस्कर | १७ |
| ४ | मराठ्यांचा गुजरात प्रांतातील सत्ता विस्तार आणि पेशव्यांचे राजकारण<br>प्रा.डॉ. शरद कौतिक भामरे | २० |
| ५ | चित्रकलेचे उपयोजन व जातकचित्र<br>आबासाहेब माणिकराव देशमुख, डॉ.पी.डी. जगताप | २५ |
| ६ | पश्चिम खानदेशातल्या साक्री तालुक्यातील सण–उत्सव व त्यासंबंधीची अहिराणी बोलीतील ओवीगीते<br>प्रा.डॉ. प्रकाश श्रीराम साळुंके | २८ |
| ७ | प्राचिन, मध्ययुगीन व पेशवेकालीन खानदेशातील राजकिय परिस्थिती<br>प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे | ३२ |
| ८ | अहिराणी बोलीचा इतिहास<br>प्रा.डॉ. सुधाकर सीताराम चौधरी | ३५ |
| ९ | पूर्व खान्देशातील स्वराज्य पक्षाचे योगदान<br>प्रा.डॉ. बाळकृष्ण त्र्यंबक पाटील | ३९ |
| १० | खानदेशातील बंजारा स्त्रियांची परिस्थिती<br>डॉ. डी.डी. राठोड | ४१ |
| ११ | खानदेशात एकोणिसाव्या शतकातील औषधी तेल तयार करण्याचे उद्योगधंदे<br>प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा | ४४ |
| १२ | खानदेशातील सण आणि उत्सव : विशेष संदर्भ बंजारा समाज<br>प्रा.डॉ. सुनिल भालेराव पाटील | ४८ |
| १३ | खानदेशातील आदिवासी जमातीची सांस्कृतिक परिस्थिती<br>प्रा.डॉ. योगेश जगन्नाथ कोरडे | ५२ |
| १४ | खानदेशातील सवाई मुकटी गावातील स्वातंत्र्य सेनानींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान<br>प्रा. गोकुळ निंबा पाटील | ५६ |
| १५ | खानदेशातील लोकसाहित्याचे विश्लेषणात्मक अवलोकन<br>प्रा. राजकुमार ज्ञानोबा चाटे | ५८ |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 76 : History of Khandesh
ISSN : 2348-7143
Dec. 2018

# शाहूराजांची सुटका व त्यांना खानदेशमधून मदत

प्रा. अनिल विठ्ठल बाविस्कर
विद्या विकास मंडळाचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
अक्कलकुवा.

शुक्रवार २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर येथे औरंगजेब बादशहाचा मृत्यू झाला. त्यावेळी शाहू राजांचा मुक्काम तेथेच मातुश्रीसह होता. मृत्यू समयी औरंगजेब बादशहा जवळ त्याचा एकही मुलगा नव्हता. मोठा शहाआलम अफगाणिस्तानात असून लहान मुलगा कामबक्ष विजापूरात होता. ही बातमी नुकत्याच माळव्याच्या सुभेदारीवर रवाना झालेल्या औरंगजेबाच्या मधल्या मुलगा आजमशहास समजली. तो त्वरेने अहमदनगरला दुसऱ्या दिवशी आल्यावर आपल्या पित्याचे शव खांदयावर घेऊन २४ फेब्रुवारीला बाहेर मंडळीच्या हवाली केले. ते त्यांनी खुल्दाबादला नेऊन दफन केले. आपल्या पिताचा खुल्दाबादला दफनाचा सोहळा आटोपून त्याने स्वत:ला बादशहा म्हणून जाहीर केले. आपला वडील बंधू शाहआलम याचा विरोध मोडून काढल्याशिवाय आपल्याला निरंकुश सत्ता लाभणार नाही. याची खात्री आजमशहाला होती. म्हणून मराठयांबरोबर सुरु असलेला लढा बंद करुन उत्तरेकडे घाईघाईने सैन्य घेऊन तो निघाला. शाहू राजे व त्याचा परिवार त्याच्याबरोबर उत्तरेकडे चालू लागले. निघतांना आजमशहाने दाऊतखान पन्नी यास विजापूरास बादशाही मनसबदार, रायभानजी भोसले यास औरंगाबादेस व निजाम उल्मील्क यास बऱ्हाणूर येथे नेमणूक करुन दक्षिणेचा बंदोबस्त केला. मात्र दक्षिणेची मुख्य सुभेदारी झुल्फिकारखानाच्या नावावर असून खान आजमशहा बरोबर उत्तरेत गेला. इकडे बादशहाच्या छावणीत जो दीर्घ काळ शाहू राजांनी काढला, त्यामुळे आपल्या सौजन्याची छाप राजपूत व कित्येक मुसलमान मंडळीवर चांगलीच बसली असल्यामुळे शिवाजीचा नातू शाहू राजेवर अनेकांचा लोभ जडला होता. त्याची पुरस्कर्ती झेब्रुन्नीसा होती. तिच्यामार्फत शाहूराजाने आपल्या सुटकेची खटपट चालविली होती.

आजमशहाची इच्छा शाहूराजास सोडण्याची नव्हती. वडील बंधूचा पाडाव करण्यात तो मग्न असून, त्या उद्योगात मराठ्यांनी दक्षिणेत अडथळा करु नये अशी दक्षता त्याने ठेवली. दि. १३ मार्च १७०७ रोजी बऱ्हाणपूरच्या मुक्कामावर झुल्फिकारखानने आजमशहाकडे शाहू राजाची बाजू मांडली. आजमशहाने शाहूराजास पोषाख दिला. शाहूराजाच्या सुटकेचा हा उपक्रम होय. पुढे शाहूराजे तसेच लष्कराबरोबर प्रवास करीत गेले. राजपुतांनी व इतरांनी आजमशहास गळ घातली की, शाहूराजास सोडावे. परंतु शाहूराजाला सोडण्याची त्याची इच्छा नव्हती. पुढे नर्मदा पार होऊन आजमशहाचा मुक्काम दि. ४ मे १७०७ रोजी सिरोजेस झाला. तसतसे शाहूराजे चिंताग्रस्त होऊ लागले.[१]

भोपाळच्या वायव्येस वीस मैलावर दोराहा गावी मुक्काम असतांना दि. ८ मे १७०७ रोजी शाहू राजांची सुटका झाली. खाफीखान लिहितो शिवाजीचा नातू राजा शाहू-हू याच्याबरोबर झुल्फिकारखानचे खास आणि घनिष्ठ संबंध होते. पूर्वीपासून तो राजा शाहूच्या सर्व कारभाराकडे आस्थापूर्वक लक्ष देत असे. झुल्फिकारखानने आजमशहाला विनंती करुन राजा शाहू व त्याचे काही सोबती यांना मुक्त करविले. औरंगजेबचा एक दरबारी लेखक भिमसेन सक्सेना थोडी वेगळी हकीकत देतो. संभाजीचा मुलगा शाहूराजा याला आलमगीर बादशहाच्या कारकिर्दीत नजर कैदेत ठेवण्यात आले होते. त्याला नंतर नुसरतजंग झुल्फिकारखान याच्या हवाले करण्यात आले. त्याला उघडउघड निरोप देणे हे इष्ट वाटले नाही, म्हणून अलीजहाच्या इशाऱ्याने राजा शाहू हा काही सहकाऱ्यांना बरोबर घेऊन दोराहाजवळ मोगल छावणी होती तेथून पळाला व त्याने दक्षिणेची वाट धरली.[२]

शाहूराजे मोगल छावणीतून पळून गेले. असे मुसलमान लेखक सांगतात, तर आजमशहाशी काही करार करण्यात येऊन शाहू राजे परत निघाले. असे मराठी लेखक सांगतात. जयपूर अकबरात व चिटणीस बखरीत तो करार दिला आहे. तो असा, शाहूने बादशाही ताबेदारीत राहून दक्षिणराज्य साध्य करावे प्रसंग पडेल तेव्हा बादशहाची कुमक व सेवा करावी, मातुश्री वगैरे कबिले व मदनसिंग ओलीस दाखल बादशहाने ताब्यात ठेवावे, चौथाई सरदेशमुखीचे हक्क दक्षिणेच्या सहा सुभ्यातून वसुल करावे. त्यांच्या सनदा मागाहून तयार करुन पाठविण्यात येतील, तुर्त दोनशे स्वार रांगडे बरोबर घेऊन जावे.[३] हा करार ठरत असतांनाच झेबुन्नीसाने प्रेमाच्या निरोप दिला. किंबहुना तिनेच भर देऊन शाहूराजास निघण्यास प्रवृत्त केले. परंतु आजमशहाने रितसर पोषाख वगैर देऊन शाहूस स्पष्ट निरोप दिला नाही.[४]

झेबुन्नीसा बेगम बोलली तुम्ही आताच निघुन जा, उद्या शहाची बुध्दी कशी फिरेल कोणी सांगावे.[५] शाहूराजाचा पाठलाग आजमशहाने केला नाही. यावरुन त्याची मुक संमती होती, हे स्पष्ट होते. मातुश्री येसूबाई दिल्लीस गेली, तिच्याबरोबर शाहूराजाने उध्दव योगदेव राजाज्ञा यास पाठविले. मोरोपंत सबनीस कोकणस्थ महादजी कृष्णाजी जोशी, नाशिककर गंगाधर भट, मनोरंजन करणारे हिंदुस्थानी ब्राम्हण शुक्लाजी काम्होजी असे हुषार लोक शाहू बरोबर दक्षिणेत आले.[६] निघताना शाहूराजांनी बादशहाच्या व बेगम झेबुन्नीसाचा निरोप घेतल. मातुश्री येसूबाई व कबिले मदनसिंग यांना हवाली करुन विरुबाई व एक राणी बरोबर घेतली. एक राणी तिथे असता वारली होती. झेबुन्नीसा बेगमने जाते समयी बहुत खातर जमा केली. तुमचे राज्य तुम्ही साधावे बादशहाशी वाकडे चालू नये, सनदा वगैरे देतील ते घ्यावे. तुम्ही औरंगजेब



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
Dec. 2018

बादशहाचे नातूच आहात. आग्रह कोणताही न धरावा. म्हणून आपल्या पुजेत पंजे होते ते दिले. याची भक्ती पुजा निष्ठेने राखावी. तुमचा हिंदु धर्म (सबब) यांचे पुजेस सैय्यद शाहमिया म्हणून हवाली केले मजला याची प्रसन्नता आहे. सैय्यदापासून फत्या करावी व इमाम साहेबांच्या फत्यानैवेद्य चिराग दगा मकान करुन फकीरफुकरा मोहरम उत्साह चालवावे, सांगितले मोठ्या संकटातही चिराग दगा मकान करुन फकीरफुकरा मोहरम उत्साह चालवावे, सांगितले मोठ्या संकाटातही यास विसरु नये. तुमची दौलत कायम चालेल म्हणून सांगून निरोप दिला. वस्त्रे जवाहीर, हत्ती, घोडे दिले. ' मातुश्री विषयी काही काळजी करु नये लवकरच रवानगी करुन देतो'. असे झेबुन्नीसाने सांगितले.७

बीजागड म्हणून लहानसे संस्थान नर्मदेच्या दक्षिणेस ते आजही बडवाणी येथे आहे. तेथे मोहनसिंग रावळ नावाचा रजपूत राजा मोगलांविरुध्द लढत असलेला, अलिकडे पाच वर्षे मराठ्यांस मिळून होता. इ.स. १७०४ साली नेमाजी शिंद्याने माळव्यात शिरुन जो प्रचंड झगडा केला, त्यास मोहनसिंगाचे मोठे साह्य होते.८ शाहूराजा व मोहनसिंग रावळचा पूर्व परिचय होता. म्हणून नर्मदा उतरताच शाहूराजे प्रथम त्याच्याकडे गेले. हे स्वामीचे स्थापित पूर्वीपासून स्वामिशी निष्ठेने वागले.९ असे त्याच्याबद्दल शाहूराजाचे वर्णन आहे. मोहनसिंगाचे पुष्ट सामुग्री फौज व पैसा देऊन शाहूराजाची व्यवस्था लावून दिली नंतर शाहूराजे नर्मदा उतरल्यावर पूर्व बाजूने बऱ्हाणपूराकडील मोगल बंदोबस्त चुकवून पश्चिम मार्गाने सातपुड्यातून बीजागड, सुलतानपूर वरुन खानदेशात आला. जोत्याजी केसकर आजमशहाबरोबर सनदा आणण्यासाठी उत्तरेत गेला. त्यास सनदा त्यास बहादुरखानकडून दि. ३ ऑगस्ट १७०७ रोजी ग्वाल्हेर येथे मिळाल्या. अशी वार्ता जयपुर अखबारात आहे.१०

शाहूरांजाना जरी प्रांरभी लष्करी बळ फारसे मिळाले नसले तरी महाराष्ट्राची नैतिक सहानभूती त्यांना मिळाली. हा पाठिंबा नुसता हिंदुचा नसून मुसलमानांचाही होता. औरंगजेबाच्या कारभाराने देशाची कशी नासाडी झाली हे सर्वांना चक्क दिसत होते. मराठ्यांचे पराक्रम व कित्येक वर्षाचे कष्ट लोकांच्या डोळ्यापुढे होते. औरंगजेब बादशहाने विनाकारण छळ चालविला होता. अशी सामान्य समजूत प्रचलीत होती. तिचा फायदा शाहूराजास मिळाला. आणि शाहूराजा परत निघताच पुष्कळसे जमीनदार व सेनानायक त्यास अनुकुल झाले. मराठे सरदार तर केव्हा ताराबाईकडे व केव्हा मोगलांकडे जाऊन स्वत:च्या स्वार्थाच्या पाठीस लागणारे होते. त्यास शाहूराजाचे आगमन उपकारक झाले. कारण शाहूराजे बादशहाची ताबेदारी पत्करुन आल्यामुळे त्यांना साह्य केल्याने मोगल अधिकाऱ्यांचे राग मानण्याचे कारण नव्हते, म्हणून जे सरदार तटस्थ वृत्तीचे ते देखील भराभर शाहूराजास सामील झाले. त्यामुळे शाहूराजांचे आसन मजबूत होत गेले.

मोहनसिंग रावळने शाहूराजांना मदत देऊन सुलतानपुरजवळ तापी नदीच्या काठी कुकरमुंडा आहे. तोरखेडा येथील जमीनदार अमृतराव कदमबांडे हा सधन होता. तो शाहूराजास मिळाला. दोघेही तापी नदी ओलांडून नंदुरबारहून इ.स. १७०७ च्या मे अखेर लामकनी येथे दाखल झाले.११ असे खाफिखान लिहितो. माळव्यात निघाल्यापासून शाहूराजे महाराष्ट्रात चहूकडे पत्रे पाठवून आपणांस सामील होण्याविषयी शेकडो लोकांना विनंती केली. या लेखनाचे काम गदाधर प्रल्हादने केले.१२ शाहूराजांचा सासरा रुस्तमराव जाधव यास शाहूराजांनी दि. २५ मे १७०७ रोजी खालील पत्र पाठविले. तुम्ही स्वामिचे आप्तविषयी लोक कित्येक कार्यास आले. म्हणून तुम्हास सप्तहजार मनसब मुक्रर केली असे.१३ लामकानीस शाहूराजांचा मुक्काम एक महिना होता. त्याठिकाणी शाहूराजांचा चांगला जम बसला. तेथील जमीनदार सुजनसिंग रावळ याने शाहूराजास भरपूर मदत केली.१४ मल्हार तुकदेव पुंदरे हा सरदार शाहूराजाला सर्वात अगोदर लामकनीस येऊन मिळला. या संदर्भात खेडच्या लढाईनंतर दि. २४ डिसेंबर १७०७ चे शाहूराजाचे पत्र लक्षात येते. मल्हार तुकदेव पुंदरे यास शाहूराजे लिहितात, स्वामीचे आगमन स्वदेशात झाले तेव्हा तुम्ही अवघ्या अगोदर लामकनीचे मुक्कामी येऊन दर्शन घेतले, कित्येक कार्य प्रयोजने केली. एकनिष्ठ सेवा करीत आहेत म्हणून स्वामी तुम्हावरील कृपालु होऊन परगणे सुपे, कसबे व सासवड या महालाची सरदेशमुखीची मुतालिक (उपमंत्री) वतन करुन द्यावयाचा निवाडा करुन हे आज्ञापत्र सादर केले असे.१५ अर्थात हे पुंदरे औरंगजेबाच्या नोकरीत झुल्फिकार खानच्या हाताखाली होते. खान उत्तरेत चालला तेव्हा ते धनाजी जाधवाकडे आले. धनाजी पुणे प्रांतात मराठयांच्या अंमल बसवित असून पुंदरे त्या प्रातांचे महितगार म्हणून त्यांचा उपयोग धनाजी जाधवास विशेष झाला. पुंदरे व बाळाजी विश्वनाथ यांचा स्नेह असून दोघांनी खेडच्या पूर्वी धनाजी जाधवांचे मन शाहूराजाच्या पक्षास वळविले. म्हणून त्यांच्या कुटुंबावर शाहूराजांची मर्जी कायम बसली.१६ पुंदरे कुटुंब व त्यांचे स्नेही बाळाजी विश्वनाथ यांनी शाहूराजांचा पुरस्कार प्रथमपासून केला. कित्येक प्रभू मंडळी शाहूराजास मिळाली. परसोजी भोसल्यांचा कारभारी बापुजी सोनाजी दिघे शाहूराजांची कामगिरी मनोभावाने करु लागले. त्यांच्याच वजनाने नेमाजी शिंदे, हैबतरावक निबांळकर, पिंगळे पेशव्यांचा हस्तक पारोळ्याचा चिमणाजी दामोदर मोघे वगैरे उत्तेरकडे वावरणारे प्रतिष्ठीत सरदार शाहूराजांच्या सेवेत रुजू झाले.१७ लामकनीचा हा जून महिन्याचा मुक्काम शाहूराजांना विशेष फायदेशीर झाला.

दिनांक. २७ जून १८०८ रोजी मुठे खोज्याचा कुलकर्णी बापूजी सोनाजी दिघे यास शाहू राजांनी पत्र लिहिले ते असे, स्वामी परराष्ट्रातून स्वराज्यात आले त्याप्रसंगी तुम्ही, परसोजी भोसले यांची जमेनिशी करीत असता, त्यांचे तर्फेने येऊन लामकनीच्या मुक्कामी स्वामीचे दर्शन घेतले. स्वामीच्या आज्ञेने परसोजी भोसलेस दर्शनास आणले. त्यावेळेस तुम्ही एकनिष्ठेने खूप सेवा केली. पुढेही निष्ठेने रहा. तुमचे कल्याण



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
Dec. 2018

करणे स्वामीस आवश्यक आहे.इ.१८ अर्थात वऱ्हाडात परसोजी भोसले व त्यांच्या बंधू साबाजी भोसले हे सरदार कामगिरीवर असता ते आपली फौज घेऊन लगोलग शाहूराजास मिळाले म्हणून शाहूराजांचा चांगला जम बसला त्यामुळे शाहूराजाला पहिला मुख्य आधार मिळाला तो परसोजी भोसले याचा होय. शाहू राज्याधिकारी नाहीत असे ताराबाईनी उत्तर केले असता परसोजी भोसलेंनी पुरतेपणी अंगीकार करुन राज्यासनी बैसविले.१९ यांनीच शाहू राज्याचा खरा वारस अशी खातरजमा केल्यावरुन हैबतराव निंबाळकर नेमाजी शिंदे वगैरे सरदार धर सोडपणा करीत होते ते शाहूराजास मिळाले.२० पिंगळे पेशव्यांचा मुतालिक (उपमंत्री) चिमाणाजी दामोदर त्यास सामील झाला. रखमाजी किन्हळे यास दि. ११ जून १७०७ चे शाहूराजांचे पत्र आहे. त्यात स्वामींच्या अभ्युदय प्रसंग होऊन या प्रांतात आगमन झाले. हे ऐकताचक तुम्ही आपले जमावानिशी येऊन लामकनीच्या मुक्कामी स्वामीसंनिध हजर झाले. आपला सेवाधर्म तो केला.२१

जुलैत शाहूराजे लामकनीहून कुसूंबा येथे आले. याठिकाणी दादाजी निलकंठ नाईक पुरंदरकर शाहूराजास मिळाले.२२ कुसुंब्याहून शाहूराजे धुळे, आर्वी, झोडगे, चाळीसगाव, मार्गे खुलताबादला गेले.२३

**संदर्भ सूची :**

१) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड - ३ पृष्ठ-२६ - २७
२) कुलकर्णी, खरे - मराठ्यांचा इतिहास,खंड -२ पृष्ठ -२
३) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड - ३ पृष्ठ-२७ - २८
४) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड - ३ पृष्ठ - २८
५) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड - ३ पृष्ठ - २८
साने का.ना. - थोरले शाहू महाराज चरित्र,पृष्ठ - ८
बेंद्रे वा.सी. - श्री. छत्रपती राजाराम महाराज, पृष्ठ - ४२९ - ४३०
६) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड - ३ पृष्ठ - ३६
साने का.ना. - थोरले शाहू महाराज चरित्र,पृष्ठ - ८
बेंद्रे वा.सी. - श्री. छत्रपती राजाराम महाराज पृष्ठ - ४२९ - ४३०
७) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३६
८) वाड, पारसनीस - शाहूमहाराजांची रोजनिशी,पृष्ठ - २०२ - २०३
सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३६
९) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३६
१०) साने का.ना. - थोरले शाहूमहाराज यांचे चरित्र,पृष्ठ - ९
११) राजवाडे वि.का. - मराठ्याच्या इतिहासाची साधने,खंड ६ लेखांक - ६,पृष्ठ १३२ - १३३
सरदेसाई गो.सं. - मराठी रियासत,खंड ३,पृष्ठ - ३७
१२) सरदेसाई गो.सं. - मराठी रियासत,खंड ३,पृष्ठ - ३७
१३) राजवाडे वि.का. - मराठयांच्या इतिहासाचे साधने,खंड-२० पृष्ठ ६०
सरदेसाई गो.सं. - मराठी रियासत,खंड-३,पृष्ठ - ३७
१४) वाड, पारनीस - श्री छत्रपती शाहू महाराज यांची रोजनिशी खंड-१,पृष्ठ-१९५,१९७,२०३
सरदेसाई गो.सं. - मराठी रियासत,खंड ३,पृष्ठ - ३७
१५) आपटे द.वि. - साधन परिचय अर्थात मराठयांचा पत्ररुप इतिहास, लेखांक-७२ पृष्ठ-७४
सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड-३,पृष्ठ-३७-३७
पुरंदरे कृ.वा. - पुरंदरे दप्तर, भाग-१, लेखांक २१३,पृष्ठ-१६७
१६) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३८ (तळ टीप)
१७) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३८
१८) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३८
१९) पारसनीस द.ब. - इतिहास संग्रह ऐतिहासिक टिपणे,भाग१,पृष्ठ ५८
सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३७
२०) काळे या.मा. - नागपूरकर भोसल्याची बखर,पृष्ठ २५-२६
सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३८
२१) राजवाडे वि.का. - मराठयांच्या इतिहासाची साधने,खंड-६ लेखांक ६, पृष्ठ १३२,
सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३९
२२) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत,खंड -३,पृष्ठ -३९
२३) सरदेसाई गो.स. - पेशवे दप्तरातून निवडलेले कागद,खंड ७, मधील नकाशा




Scanned with CamScanner

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue March 2018

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal



Indian Council of Social Science Research

Indian Council of Social Science Resear (ICSSR)
Western Regional Centre, Mumbai

Sponsored

**One Day Multi Disciplinary National Seminar**

On

# Human Rights and Tribal : Issues and Strategies for Empowerment

4th March 2018

Organized by

Nandurbar Taluka Vidhyak Samiti's

**College of Law**

Institute of Legal Education and Research,
Nandurbar (MS)-425412

Convener

**Dr.N.D.Chaudhari**

Organising Secretary/Coordinator

**Prof.S.S.Hasani**

Scanned with CamScanner

45) HUMAN RIGHTS OF TRIBAL WOMEN - SOCIO LEGAL STUDY
Chitranga Chaudhari, Jalgaon. || 166

46) Constitutional and Legal Rights of tribal people
Dr. Bahiram V.Y || 169

47) RIGHTS OF TRIBALS IN INDIA AND ACCESS TO JUSTICE THROUGH CONSTITUTIONAL....
Dr. Manish Sonawane, Nasik || 173

48) "Steps needed to ensure tribal Education & Development"
Dr. Rohit Arun Pardeshi, Nandurbar. || 176

49) Right s of Indigenous people really protected in India!?
Dr.B.Yuvakumar Reddy, Jalgaon. || 180

50) Constitutional and legislative Protections of Tribal in India – An Analytical ......
Adv. Lalita Madhukar Sapkale, Jalgaon. Dr. B.Yuvakumar Reddy, Jalgaon || 185

51) A STUDY OF AWARENESS AMONG B.Ed. TRAINEE TEACHERS ABOUT RTE ACT-2009
Shri. Kailas Santosh Chaudhari, Nandurbar || 189

52) मानवी अधीकार आणि आदिवासी महीला सबलीकरण
सहा.प्रा.आर.एन.नगराळे, नंदुरबार || 193

53) बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे दलित व आदिवासी विषयींचे शैक्षणिक योगदान
प्रा. अनिल विठ्ठल बाविस्कर, अक्कलकुवा -प्रा. डॉ. अरविंद श्रीराम देसले, नंदुरबार || 195

54) मानवी हक्क आणि बाल कामगार
सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे, तासगाव || 197

55) आदिवासी महिलांच्या विकासातील समस्या
प्रा.डॉ.आर.एम.साळुंके,-नंदुरबार || 200

56) बालकामगारांना मानवी हक्काची जाणीव करून देण्यास शिक्षकाची भूमिका
कु.ज्योती आर.लष्करी,नाशिक -प्रा.प्रमोद डी.वाघ,नाशिक || 203

57) बालमजूर आणि मानवी हक्क
प्रा. प्रतिभा उरसळ, चर्चगेट, मुंबई || 207

58) मानवी हक्क व महिला सबलीकरण
प्रा.डॉ.सुषमा प्रमोद पाटील, नंदुरबार || 212

59) उत्तर महाराष्ट्रातील आदिवासींमधील शैक्षणिक परिवर्तन व त्यांचे मानवी हक्क
प्रा. डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे, म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे || 214

60) 'नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा सामाजिक आणि आर्थिक विकास'
डॉ.वायसे शामराव भगवान, नंदुरबार || 217

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03



Scanned with CamScanner

दृष्टीकोन असावा महिलांना उच्च शिक्षणाबरोबर माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण देऊन त्यांचा सहभाग वाढवावा महिला सबल बनविण्यासाठी आणि जिवंत लोकशाही निर्मितीसाठी आदिवासी महिलांना आर्थिक कार्यांची संधी देऊन आर्थिक स्वयंपूर्ण करावे.

आदिवासी महिलांच्या घटनात्मक तरतुदी केलेल्या आहे. घटनेच्या १६ व्या कलमानुसार अनुसुचित जमातींना शिक्षण,नोकरी आणि राजकीय क्षेत्रात उपलब्ध करून दिले आहेत. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीने स्थानिक व शहरी स्वराज्य संस्थेत लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दिले आहे. आदिवासी महिलांच्या सबलीकरणासाठी आज काही प्रमाणात स्वयंसेवी संस्थाची स्थापना झाली आहे. ह्या संस्था आदिवासी महिलांकरिता वेगवगळया प्रकारचे कार्य करीत आहेत. आदिवासी महिलांकरीता सरकार द्वारे खुप कमी पैसा खर्च होतो. याप्रमाणात वाढ होणे गरजेचे आहे . प्रबळ राजकीय इच्छा शक्तीच्या जोरावर आदिवासी महिलांना सबळ बनविता येईल.

शिक्षण, रोजगार आणि राजकीय इच्छा शक्तीद्वारे आदिवासी महिलांचे सबलीकरण होईल.

**संदर्भसुची:-**

१) भारताचे संविधान :- राजगोपाल द्रविड
२) कायदे स्त्रीयांचे व मुलांचे :- अॅड. जोशी विजय नारायण सुधारणा अॅड. टिपणीस आर. आर. मुंकूद प्रकाशन
३) वनवासी राजा :- प्रा. डॉ. जाधव एन.एल
४) आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना :- डॉ. आकरे बी. एन.

**वेब साईड**

१) www.nest.nic.in
२) https//tribal.nic.in/st/statistical profile ofsts २०१३.pgf

**53**

# बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे दलित व आदिवासी विषयींचे शैक्षणिक योगदान

**प्रा. अनिल विठ्ठल बाविस्कर**
संशोधक, इतिहास विभाग, वि.वि.मं. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि. नंदुरबार
**प्रा. डॉ. अरविंद श्रीराम देसले**
संशोधक , मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुख, जी.टी.पी. महाविद्यालय, नंदुरबार जि. नंदुरबार

**********

**प्रस्तावना :-**

बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचा शैक्षणिक दृष्टीकोन व्यापक होता. दलित व आदिवासी समाजाच्या मुलामुलींनी शिक्षणापासून वंचित राहू नये असे त्यांना वाटत होते. यासाठी त्यांच्या संस्थानात मोफत प्राथमिक शिक्षण केले. हा हिंदुस्थानातील पहिला क्रांतीकारी निर्णय होता. तसा त्यांनी कायदा मंजूर करुन घेतला. राज्यातील प्रजा अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्रय व रोगराईने पिचलेली होती. लोकांच्या श्रध्देला तडा जाऊ न देता त्यांच्यात शिक्षण रुजविले पाहिजे त्यासाठी लोकशिक्षण आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते.

१९ व्या शतकातला उत्तरार्ध व विसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा युरोपातून आलेल्या आधुनिकतेने भरलेला कालखंड आहे. आधुनिकतेची कास धरण्याची इर्षा भारतातील नव सुशिक्षितांत निर्माण झाली होती. शिक्षण हे प्रगतीपर भावनांचे बीजारोपण करण्याचे साधन आहे. अशी सयाजीरावांची ठाम समजूत होती. शिक्षणामुळे दलित, आदिवासी मुलांमध्ये परिवर्तन घडून येईल असे त्यांना वाटे. त्यासाठी त्यांनी इ.स.स १८८२ मध्ये शिक्षणासाठी विविध शाळा, आश्रमशाळा, महाविद्यालये निर्माण केली होती.

**१) एक गाव एक शाळा:-**

एक गाव एक शाळा असणे अत्यंत आवश्यक आहे असे महाराजांच्या पूर्णपणे लक्षात आले होते. राज्यामधील दारिद्रय, गरीबी



Scanned with CamScanner

व बेरोजगारी या सर्वांचे मुळ अज्ञान आहे. म्हणून महाराजांनी एक गाव एक शाळा हा उपक्रम त्यांच्या संस्थानात राबविला आणि त्याचा परिणाम बऱ्याच संस्थानांमध्ये देखील एक गाव एक शाळा हा प्रयोग राबविला जाऊ लागला होता. काही वर्षात पस्तीसशे गावात शाळा सुरु केल्या. प्रत्येक खेडयात शाळा स्थापन होऊन लोकांच्या उंबरठयापर्यंत ज्ञानाची गंगा महाराज सयाजीराव गायकवाड यांनी नेली. लाखो मुले व मुली शिक्षण घेऊ लागले. पुढे त्यांनी माध्यमिक शाळा देखील खेडोपाडी सुरु केल्या.

**२) महाविद्यालयाची स्थापना:-**

बडोदे शहरात महाविद्यालये अस्तित्वात नव्हती. त्या बडोदा शहरात महाराजांनी महाविद्यालयाची स्थापना केली. अशा रितीने महाराजांनी शिक्षणाचा प्रसार मोठया झपाटयाने त्यांच्या संस्थानात केला.

**३) मोफत सक्तीचे शिक्षण:-**

गरीब पालक आपल्या मुलांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी शाळेत न पाठविता कामावर पाठवित होते. आणि आपला उदरनिर्वाह करिता होते. हे महाराजांनी हेरले आणि सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले आणि गोरगरीबांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडी केली.

**४) व्यावसायिक शिक्षण:-**

महाराज सयाजीराव गायकवाड हे गरीबांचे कैवारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी असे चित्र पाहिले की, गोरगरीब लोक मुलांना शाळेत न पाठविता कामावर पाठवितात, शिक्षण देत नाही आणि त्यांच्या असे लक्षात आले की, त्या गोरगरीबांना शिक्षणापेक्षा त्यांची पोटाची खळगी भरणे महत्वाचे होते. त्यासाठी त्यांनी व्यावसायिक शिक्षणाचा पाया रोवला.

**५)कमवा शिका योजना:-**

महाराजांनी आपल्या महाविद्यालयामध्ये माध्यमिक शाळांमध्ये कमवा व शिका योजना राबविली होती. या योजनेमध्ये जे गरीब विद्यार्थी होते ते आपले शिक्षण नियमित शाळेमध्ये घेऊ शकत नसत कारण शाळेत येण्यासाठी व शिक्षणासाठी पैसा आवश्यक असतो. आणि त्यासाठीच महाराजांनी विद्यार्थ्यांना कमवा व शिका योजनेची स्थापना करुन गोरगरीब विद्यार्थी शिकू लागले व आपल्या आर्थिक गरजा भागवू लागले.

**६) दीन दलितांना शिक्षणाची संधी:-**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी हरिजन मुलांना शिक्षण मिळावे म्हणून शाळा काढल्या. मुस्लीमांसाठी उर्दू शाळा काढल्या. महाराजांनी सर्व जातीधर्मासाठी शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याचा मानस हाती घेतला होता.

**७) आश्रमशाळांची स्थापना:-**

आदिवासी जमातींच्या मुलांसाठी सोनगढ, व्यारा इत्यादी ठिकाणी आश्रमशाळा स्थापना केली. तेथील मुलांना भोजन, निवास व अध्ययन या सोयी मोफत केल्या. त्यांनी इतर जातीधर्मांच्या मुलांसाठी देखील आश्रमशाळांची स्थापना केली.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी महाराजांचा मानस होता. पूर्वी हरिजन विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शाळा होत्या मात्र हळूहळू त्या शाळा रदद करुन इतर शाळेत हरिजन मुलांची सोय करुन त्यांनी अस्पृश्यतेची भावना कमी करण्यासाठी शिक्षणामार्फत अस्पृश्यता नष्ट केली.

बिघडलेल्या अल्पवयीन मुलांसाठी सुधारगृहाची स्थापना करुन त्यांना मोफत शिक्षण देऊन समाजात मानाने जगता येईल अशी व्यवस्था केली. सुधारगृहात सुसंस्कार, धार्मिक प्रवचन, श्लोक इत्यादींचे पठण केले जात होते. व सांस्कृतिक मुल्ये त्या अल्पवयीन मुलांमध्ये रुजविले जात होते. यामुळे अशी मुले समाजात मोठमोठया हुदयावर जाऊन मानाने जगू लागली.

**८) मुकबधीर व अंध आणि निराधारांसाठी शाळा:-**

महाराजांनी त्यांच्या संस्थानात निराधार मुलांसाठी शिक्षणाची व राहण्याची सोय करुन दिली एवढेच नाही तर त्यांनी मुकबधीर व अंध विद्यार्थ्यांना बडोदा व मेहसाणा येथे आश्रमशाळा सुरु केल्या त्यांच्या जीवनाचा कायापालट घडवून आणला.

**सारांश:-**

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दलित व आदिवासी मुलांमुलींसाठी शैक्षणिक दृष्टीकोन विशाल ठेवून जनहिताचे कल्याणकारी कायदेपास करुन सुधारणा घडवून आणल्या. कन्या विक्रयबंदी, बालविवाह, विधवा पुर्नविवाह या सामाजिक सुधारणांबरोबरच स्त्री शिक्षण देऊन स्त्रीयांना सामाजिक न्याय मिळवून दिला. समाजातील दलित, आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी विविध शाळा, आश्रमशाळा काढून त्यांना शिक्षणाची द्वारे खुली केली. शिक्षणाने व्यक्ती व समाज आणि राष्ट्रात परिवर्तन होते. हे सयाजीरावांनी ओळखले होते. त्यासाठी बडोदा संस्थानात शिक्षणाचे यशस्वी प्रयोग केले. त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व संस्थानांना शैक्षणिक कार्यासाठी सढळ हाताने मदत केली. त्यांचा मानवतावादी दृष्टीकोन विशाल होता. शिक्षणाच्या माध्यमातून दलित व आदिवासी मुलांचे शैक्षणिक मूल्य वृध्दींगत करण्यात महाराज सयाजीरावांचे योगदान मौलीक आहे.

**संदर्भसूची**

१. खोबरेकर विठ्ठल गो. (१९६२) गुजरातेतील मराठी राजवट,



Scanned with CamScanner

राजहंस प्रकाशन पुणे.
२. गाडगीळ गंगाधर (२००८) एक होता राजा, ग्रंथायन, मुंबई
३. दांडेकर वि.पा. (१९५३) सयाजीराव गायकवाड, ग.ल. ठोकळ प्रकाशन, पुणे
४. बाबा भांड, लोकपाल राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद
५. डॉ. रमेश वरखेडे, सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड १,२,३ साकेत प्रकाशन, औरंगाबाद
६. पवार निंबाजीराव (१९८६) जेव्हा गुराखी राजा होतो, सयाजी प्रकाशन, नाशिक
७. शर्मा बंसीधर (१९७७) श्री. सयाजीराव गायकवाड, महाराजा सयाजीराव गायकवाड ट्रस्ट, बडोदा
८. भगवंत पाळेकर, जागृती पत्रकातील अग्रलेखांचा संग्रह
९. अग्नीहोत्री गणेश (२००३) श्रीमंत सयाजीराव गायकवाड, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
१०. नेने वि.पा. (१९४२) बडोदयाचा राज्यकारभार, पु.आ. चित्रे बडोदे
११. आपटे दाजी गणेश (१९३६) श्री. महाराजा सयाजीराव गायकवाड, (तिसरे) यांचे चरित्र खंड १,२,३ प्रकाशक खुद, बडोदे

**54**

# मानवी हक्क आणि बाल कामगार

**सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे**
महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव

**********

कोणत्याही देशात लहान मुलांच्या विकासाला सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. राष्ट्राचे भवितव्य हे राष्ट्रातील बालकांच्या हाती आहे. परंतु आज एकविसाव्या शतकात वळून पाहताना बालकांचा योग्य दिशेने विकास झालेला दिसून येत नाही बालकांचा विकासामध्ये खूप समस्या जाणवतात. त्यामध्ये प्रामुख्याने बालशिक्षण, कुपोषण बालमृत्यू, बाल कामगार अशासारख्या समस्या भेडसावतात.

जगातील सर्वाधिक बाल कामगार आज भारतात आहेत. बाल कामगार अनेक कारणांमुळे होतात. मुख्यत: कुटुंबाचा शैक्षणिक दर्जा, आर्थिक परिस्थिती, प्राथमिक शिक्षणाची उपलब्धता, मूलभूत सुविधांचा अभाव, कुटुंबातील चालीरीती, रूढी, परंपरा यासारख्या अनेक गोष्टीशी जोडलेल्या आहेत. परंतु या बालकांना कामापासून मुक्त करणे, कामापासून दूर ठेवणे आणि त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे सोपे नाही. भारतात आर्थिक उत्पन्नाची विषमता मोठ्या प्रमाणात आढळते. त्यामुळे बहुतांश लोकांच्या वाट्याला दारिद्र्य आले आहे. मुख्यत: कुटुंबात अधिक संख्या त्यामुळे कुटुंब प्रमुखाला उत्पन्नामध्ये कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अवघड जाते. तेव्हा उत्पन्न वाढीसाठी घरातील बालकांना कामाला लावतात. त्यामुळे मुलांना मोफत व शिक्षणाच्या सक्तीचे असणारे शिक्षण घेणे शक्य होत नाही. मुलांना कामावर जावे लागते म्हणून बाल कामगार शाळेत न जाता तो कुटुंबाची उपजीविका करीत असतो त्यालाच बाल कामगार म्हणतात.



Scanned with CamScanner


Volume 8 (Special Issue 11)
April, 2018

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270
UGC Journal list No. 64768





१४ एप्रिल २०१८ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त...

## सामाजिक समतेचे प्रणेते - महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**Editor : Dr. R.V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com Visit - www.jrdrvb.com

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 41 | प्रा.डॉ. कविता साळुंके<br>कु. ज्योती लष्करी | महात्मा जोतीराव फुले यांचे जीवन कार्य (१८२७ ते १८८१) | 134-135 |
| 42 | प्रा.डॉ.एस.एस.मायी<br>प्रा.दिलीप आर.चव्हाण | समाजसुधारकांच्या कार्यामुळे स्त्रियांच्या राजकिय जीवनावर झालेला परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास | 136-138 |
| 43 | सौ. सारिका व्ही. पाटील | महात्मा ज्योतीराव फुले : स्त्री शिक्षणाचे व सामाजिक क्रांतीचे उद्‌गाते | 139-141 |
| 44 | वर्षा घनश्याम मनवर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक विचार आणि कार्य | 142-145 |
| 45 | प्रा. प्रेमलाल नुरा नाईक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | 146-148 |
| 46 | प्रा. अनिल विठ्ठल बाविस्कर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना | 149-151 |
| 47 | अंजली लक्ष्मण जोडमोटे | महात्मा फुले यांचे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक पत्रकारिता विषयक विचार व कार्य | 152-154 |
| 48 | प्रा.डॉ.सौ. दीपा अनिल पाटील | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार आणि शिक्षणाची सद्यस्थिती | 155-157 |
| 49 | प्रा.वैशाली नानाभाऊ बागुल | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीयांसाठी योगदान | 158-159 |
| 50 | प्रा. विद्या खंडारे - गोवंदे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक बहुआयामी व्यक्तीमत्त्व | 160-161 |
| 51 | प्रा. चव्हाण जी. पी. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित चळवळीतील नेतृत्व | 162-163 |
| 52 | Prof. Devidas Adhar Pardhi | Dr Br. R. Ambedkar's Contribution for Women Empowerment | 164-166 |
| 53 | Mr. A. D. Akhade | Understanding the Great Souls | 167-169 |
| 54 | Pradeep Kumar | The contribution of Dr. Bhimrao Ambedkar for Shaping Modern India with special reference to his contribution for education | 170-174 |
| 55 | Dr.Priya Narendra Kurkure | Contribution of Mahatma Jyotiba Phule for Society | 175-178 |
| 56 | प्रा.डॉ.राजेंद्र काशिनाथ बाविस्कर | महात्मा जोतिराव फुले के सामाजिक विचार | 179-181 |
| 57 | प्रा. सौ . दिपाली आर. पाटील | राजर्षी शाहू महाराज यांचे अनिष्ठ प्रथाबंदी व स्त्री मुक्ति विषयक विविध कायदे व कार्य | 182-184 |
| 58 | प्रा. डॉ. जे. डी.गोपाळ | राजर्षी शाहू महाराजांचे गरीबांसाठी शैक्षणिक कार्य | 185-188 |
| 59 | प्रा. एम.जी. वसावे | डॉ. बाबासाहब अंबेडकर जी का सृजनात्मक साहित्य | 189-191 |
| 60 | प्रा.रमेश एस. पाटील | महात्मा फुले, राजर्षी शाहु व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 192-195 |




Scanned with CamScanner

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना"

प्रा. अनिल विठ्ठल बाविस्कर (इतिहास विभाग)
विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य
महाविद्यालय, अक्कलकुवा जि. नंदुरबार

- **प्रस्तावना -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, क्रांतिसुर्य, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले समग्र आयुष्य दीन-दलित, पीडित, वंचित, महिला, श्रमिक, कामगार यांच्या उत्थानासाठी कार्य केले. त्यांनी दलितांना समाजात मानाचे स्थान मिळवून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात कार्य करून आपले मोलाचे योगदान दिले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून दलितांना आरक्षण प्राप्त करून दिले. त्यामुळे दलितांना प्रगतीचा मार्ग मोकळा झाला. त्याची आर्थिक, सामाजिक, राजकीय, वैचारीक, बौद्धिक, शैक्षणिक अशा सर्वच दृष्टीने प्रगती झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांचे कैवारी, स्त्रीसक्षमीकरणाचे पुरस्कर्ते, एक महान विचारवंत, उत्कृष्ट अर्थतज्ञ व प्रकांड पंडीत होते. त्यांनी आपल्या असीमित बुद्धीमत्तेच्या बळावर समग्र समाजाच्या उत्थानाचे कार्य केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना निर्मितीत बहुमोल कार्य केले, त्या अनुषंगाने राज्य घटना निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे त्यातील योगदान यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधाद्वारे केला जात आहे.

- **भारतीय राज्यघटना निर्मितीची पार्श्वभूमी -**

जवळ-जवळ दीडशे वर्ष भारतावर ब्रिटिशांची राजवट होती. दुसऱ्या महायुध्दा दरम्यान भारताला स्वातंत्र्य
मिळण्याची आशा निर्माण झाली आणि १५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी भारताची नवीन
घटना कशी असावी याचा विचार-विमर्श भारतीय नेत्यांमध्ये सुरू झाला. त्या अनुषंगाने १९४६ मध्ये ब्रिटिशांनी एक मिशन
भारतात पाठविले. त्याला कॅबिनेट मिशन असे म्हणतात. ह्या मिशनने दिलेल्या सूचनांचा स्वीकार करण्यात आला आणि
'घटना समिती' निर्मितीच्या प्रक्रियेस व्यावहारीक पातळीवर सुरूवात झाली. दि.०९ डिसेंबर १९४६ ला भारतीय घटना
समितीच्या कामकाजाला सुरुवात होऊन २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ते पूर्ण झाले. दि. २६ जानेवारी १९५० रोजी प्रत्यक्षात ही
घटना लागू करण्यात आली. भारताची ही घटना निर्माण करण्यास बराच अभ्यास करावा लागला. याकरिता वेगवेगळ्या
समित्या गठीत कराव्या लागल्या. विविध समित्यांपैकी 'मसुदा समिती' एक होती. या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब
आंबेडकर यांनी कार्य केले. मसुदा तयार करण्याची जबाबदारीही त्यांनी एकट्यांनीच पार पाडली. म्हणूनच बाबासाहेब
आंबेडकरांना 'आधुनिक भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' असे म्हणतात.[१]

भारतात ब्रिटिशांची राजवट संपून देश स्वतंत्र झाल्यानंतर देशाचा कारभार स्वतंत्रपणे सुरू झाला. स्वतंत्र
राज्यघटना निर्मितीमुळे जनसामान्यांना खऱ्या अर्थाने व्यक्तिस्वातंत्र्य प्राप्त होऊन त्यांचा विकास झाला. भारत खऱ्या अर्थाने
सार्वभौम राष्ट्र बनले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कॅबिनेट मिशन योजनेत घटना समितीच्या निर्मितीची तरतूद करून पुढील प्रत्यक्ष
कार्याला प्रारंभ झाला. या घटना निर्मितीच्या कार्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत मोलाचे कार्य केले. कुठल्याही
देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर सार्वभौम राष्ट्र निर्मितीसाठी संविधान निर्मितीचे काम केले जाते. संविधान हाच आधारभूत
कायदा असतो. त्याच्या निकषावरच देशाचे कामकाज चालते. संविधान म्हणजे 'सर्वश्रेष्ठ कायदा' होय, असेही म्हटले जाते.[२]

- **घटना समितीची स्थापना -**

कॅबिनेट मिशन योजनेनुसार भारताच्या राज्यघटना निर्मितीसाठी घटना समिती स्थापन करण्यात आली. या घटना
समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद होते. अनेक विद्वान, कायदे पंडित या घटना समितीमध्ये समाविष्ट होते. डॉ. बाबासाहेब
आंबेडकर पश्चिम बंगाल प्रांतातून घटना समिती सदस्य म्हणून गेले होते. घटना समितीच्या काही उपसमित्या गठीत
करण्यात आल्या. सर्व उपसमित्यांना कार्य विभागून देण्यात आले होते. सर्व समित्यांनी आपआपले अभ्यासपूर्ण अहवाल
तयार करुन घटना समितीकडे सादर केले. या अहवालांचा अभ्यास करुन राज्यघटना तयार करण्यासाठी मसूदा समिती
तयार करण्यात आली. भारतीय संविधानाची निर्मिती करतांना घटनासमितीने संसदिय लोकशाहीचा पुरस्कार केला होता.[३]



Scanned with CamScanner

- **मसूदा समितीची निर्मिती -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मसूदा समितीचे अध्यक्ष होते. मसूदा समितीत बाबासाहेबांच्या व्यतिरिक्त इतर सहा सदस्य म्हणजे एकूण सात सदस्य होते. या समितीचे संपूर्ण कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच पूर्णत्वास नेले होते. या सात सदस्यांपैकी एक सभासद मृत्यू पावला, एक अमेरिकेत गेला, एकाने राजीनामा दिला, एक संस्थानिकासंबंधीच्या कामात गुंतलेला असल्यामुळे असून नसल्यासारख्याच होता, दोन सभासद दिल्लीहून दूर होते, त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे तेही उपस्थित राहत नव्हते. अशा प्रकारे घटना तयार करण्याचा भार एकट्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर पडला. डॉ.बाबासाहेब आंबेडकारांनी आपल्या शरीरस्वास्थ्याकडे दुर्लक्ष करून, त्याची चिंता न करता खूप परिश्रम पूर्वक सखोल आभ्यासाने राज्यघटना निर्मितीचे कार्य पार पाडले. जगातील विविध घटनेचा अभ्यास करुन भारतीय जनतेचा व संस्कृतीचा विचार करुन विविध मुद्यावर सखोल चर्चा करुन भारतीय संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केले.[४]

- **भारतीय राज्यघटना व मुलभूत अधिकार -**

"राज्यघटना म्हणजे शासनाचा राज्यकारभार कोणत्या नियमानुसार, तत्वानुसार चालेल यांचा मुलभुत संच होय." कोणत्याही देशाच्या राज्यकारभारासाठी लिखित संविधान अत्यंत महत्त्वाचे असते. कारण संविधानाच्या चौकटीतच शासनाला कार्य करायचे असते. संविधानाच्या चौकटीत राहुनच देशात स्थिरता निर्माण होते. भारतीय संविधानाने भारतीय नागरीकांना दिलेली अमुल्य देणगी म्हणजे 'मुलभुत अधिकार' होय. मुलभुत अधिकार म्हणजे, व्यक्तीला सर्वांगीण विकासासाठी पूरक परिस्थिती निर्माण करणे होय. मुलभुत अधिकारांशिवाय व्यक्तीला स्वत:चा विकास साधता येत नाही. भारतीय राज्यघटनेत मुलभूत अधिकारांचा स्वीकार अमेरिकेच्या संविधानावरून घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक नागरीकाला मुलभुत अधिकार प्राप्त झाले आहेत. भारतीय संविधानातील विभाग-३ कलम १२ ते ३५ मध्ये मुलभुत अधिकारांविषयी सविस्तर चर्चा केली आहे. हजारो वर्षापासुन भारतातील विशिष्ट वर्गाच्या लोकांवर अन्याय होत होता. तो अन्याय दुर करण्यासाठी व त्यांना ताठ मानाने जीवन जगता येण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दूरदृष्टी ठेऊन मुलभुत अधिकाराचा समावेश भारतीय राज्यघटनेत केला. प्रामुख्याने भारतीय संविधानात सात प्रकारचे मुलभुत अधिकार होते. परंतु इ.स. १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार मालमत्तेच्या अधिकाराला वैधानिक स्वरुप प्राप्त झाले म्हणून मालमत्तेचा मुलभुत अधिकार वगळण्यात आला. भारतीय नागरीकांना सहा प्रकारचे मुलभुत अधिकार प्राप्त झाले आहेत.[५]

- **नागरिकांचे मुलभूत अधिकार -**

**१) समतेचा अधिकार (कलम १४ ते १८) -**

'सर्व कायद्यासमोर समान व सर्वांसाठी एकच कायदा' या तत्त्वाच्या आधारे समतेचा अधिकार देण्यात आला. भारताची विषमता दूर करण्यासाठी समतेचा अधिकार महत्त्वपूर्ण ठरला आहे. या अधिकारानुसार कुठल्याही जात, धर्म, वंश, लिंग इ. घटकांवर आधारीत भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी प्राप्त करुन देण्यात आली. समाजातील ज्या घटकांना हजारो वर्षो आपल्या हक्क व अधिकारांपासून दूर ठेवण्यात आले अशा सामाजिक घटकांच्या विकासासाठी विशेष तरतुद याद्वारे करण्यात आली. भारतातील अस्पृश्यता निवारणासाठी समतेच्या अधिकाराचे योगदान महत्तवपूर्ण आहे.

**२) स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९ ते २२) -**

तळागाळातील अन्यायाने पीडित, वंचित घटकांच्या सर्वांगिण विकासासाठी भारतीय नागरीकांना स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. याबरोबर व्यक्तीच्या जीविताचे स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी पुढीलप्रमाणे अधिकार देण्यात आले आहेत.

३) शोषण व पिळवणुकी विरुध्दचा अधिकार (कलम २३ ते २४)

४) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (कलम २५ते २८)

५) सांस्कृतीक व शैक्षणिक अधिकार (कलम २९ ते ३०)

६) घटनात्मक उपाय योजनाचा अधिकार (कलम ३२)

या मुलभुत अधिकारांना संरक्षण प्राप्त करण्याचे कार्य घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार करतो, म्हणून डॉ. बाबासाहेबांनी या कलमांना 'भारतीय राज्यघटनेचा आत्मा व प्राण' असे संबोधले आहे. भारतीय संविधानात मुलभुत अधिकारांना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. त्यांना कायदेशीर व न्यायलयीन महत्व प्राप्त झाले आहे. शासनाने किंवा



Scanned with CamScanner

कायदेमंडळाने मुलभुत अधिकारावर अतिक्रमण करणारा कायदा केला तर न्यायमंडळ न्यायालयीन पुर्नविलोकनाच्या आधारे तो कायदा रद्द करते. मुलभुत अधिकार हे सर्व संस्थावर बंधनकार असतात. अशाप्रकारे मुलभुत अधिकारामुळे भारतातील दीन-दुबळ्या, वंचित, पीडित, अन्यायग्रस्त तसेच समग्र जनसामान्यांना समाजात ताठ मानेने जीवन जगता यावे यासाठी नागरिकांना मुलभूत अधिकार देण्यात आले आहेत. मानवाच्या मानसिक, भौतिक व नैतिक विकासासाठी मुलभूत अधिकार अत्यंत महत्त्वाची असतात, याद्वारे हे स्पष्ट होते.[५]

- **समारोप -**

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे देशाच्या राज्यघटना निर्मितीतील योगदान अद्वितीय व बहुमोल आहे. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधूता या मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी प्रत्येकाने आपले राष्ट्रीय कर्तव्य योग्य रितीने बजावून राज्यघटनेच्या माध्यमातून देशाला विकासाच्या गतीने प्रगतीशील करणे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे. हा देश खरोखरच विकासोन्मुख मार्गाने गतिशील करावयाचा असेल तर भारतीय राज्यघटनेची उदात्त तत्त्वांना कर्तव्याची जोड देणे महत्त्वपूर्ण आहे. देशातील समस्त दीन-दलितांना, पीडितांना, वंचितांना तसेच अल्पसंख्यांकाना विकासामध्ये अग्रक्रम दिला पाहिजे. त्यांची दडपशाही अशीच सुरु राहिली तर त्याचे ते देशाच्या एकात्मतेला बाधक ठरणार आहे. देशातील दलित, उपेक्षित व अल्पसंख्याकाच्या भावनेची व त्यांच्या समस्यांची जाण ठेऊन त्यांना समाजाच्या प्रवाहात सामील करणे हाच राज्यकर्त्यांसाठी श्रेयस्कर मार्ग आहे. इतिहासाची पुनरावृत्ती टाळून समाजाला योग्य अशा विकासात्मक मार्गावर नेण्याचे कार्य भावी पिढीच्या हातात आहे. यासाठी सर्व समाजाने एकत्र होऊन सामाजिक समरसता, एकोपा व बंधूता वाढवण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे, हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला खरी आदरांजली म्हटली जाईल.

**संदर्भ -**

१) डॉ. शांता कोठेकर - आधुनिक भारताचा इतिहास (१९४७-२०००) श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर-२०१०
२) डॉ.विजय तुंटे, प्रा.संदिप नेरकर - भारतीय राज्यव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०११
३) डॉ. रावसाहेब कसबे - डॉ.आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे-२००१
४) चपळगावकर नरेंद्र - भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्या प्रकाशन, पुणे-१९९४
५) वि. मा. बाचले - भारतीय राज्यघटना, के. सागर पब्लीकेशन, २०१० पुणे.
६) डॉ.पुखराज जैन - भारतीय शासन एवं राजनिती, साहित्य भवन पब्लीकेशन्स, आग्रा

-----------------------------*****-----------------------------



Scanned with CamScanner